| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ०६ वा | शुक्रवार दिनांक ०६ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### एचपी मोटार व केबलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी माणिक गोरोबा शिंदे, वय ४४ वर्षे, रा. इंदीरानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे मोहेकर चौक देवीरोड येथे असलेले मोटार रिवायडींगचे बंद पत्राचे शेडमधील लाडा लक्ष्मी ३ एचपी मोटार, लाडा लक्ष्मी १.५ एचपी मोटार, फोर्स वन १०० फुट केबल,असे एकुण २४,५००किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने शेडचे पाठीमागील पत्रा दि.०३.०३.२०२६ रोजी उचकटुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी माणिक शिंदे यांनी दि.०४.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५, ३३१(१), ३३१(४) गुन्हा नोंदवला आहे.

### जलशुद्धीकरणात चोरी : गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०४.०३.२०२६ रोजी डिकसळ येथील जल शुध्दीकरण केंद्र येथुन एक ८० एमए चा भटुर काळ्या रंगाचा वॉल, टेलपीस, २५० एमएमसीआय जॉईट नग असे एकुण १३,००० किंमतीचा माल सोनाली रा. बार्शी नाका बीड, ताई विष्णु अंकुशे रा. बार्शी नाका बीड, जिजाबाई, रा. केज जि. बीड, तारामती, रा. केज जि. बीड यांनी चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भैरवनाथ भगवान राखुंडे, वय ५४ वर्षे, रा. मार्केट यार्ड कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०४.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२),३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गडदेवदरी येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे फिर्यादी नामे-ओम विजय कांबळे, वय १९ वर्षे, रा. गडदेवदरी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. २८.०२.२०२६ रोजी फिर्यादीचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ओम कांबळे यांनी दि.०४.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोहा येथून मोटारसायकल चोरली

कळंब(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी खैसर आमीन शेख, वय २६ वर्षे, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची टिव्हीएस रेडऑन काळ्या रंगाची मोटरसायकल क्र एमएच२५ बीएच ३२३१ ही दि. ०३.०३.२०२६ रोजी फिर्यादीचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-खैसर शेख यांनी दि.०४.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## विज्ञानाचे सकारात्मक संशोधन होणे ही काळाची गरज: विज्ञान दिनानिमित्त डॉ.देशमुख यांचे प्रतिपादन




धाराशिव(प्रतिनिधी)- विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांची संशोधनात्मक प्रवृत्ती वाढीस लागणे गरजेचे आहे, मागील १२ वर्षांपासून महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनी विज्ञान परिषद आयोजित केली जात आहे. या परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षणाची, ज्ञानाची प्राप्ती होते, अनुभवाच्या आणि अभ्यासाच्या जोरावर आजपर्यंत महाविद्यालयातील बरेच विद्यार्थी मोठ्या पदावर काम करत आहेत. वैज्ञानिक आविष्कार हे सामाजिक कल्याणाच्या विकासाचे भान ठेवून होते असे प्राचार्य डॉ संदीप देशमुख यांनी प्रतिपादन केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या पोस्टर प्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन केले होते, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी परिक्षक म्हणून रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.मकरंद चौधरी, व्यंकटेश महाजन महाविद्यालय धाराशिवचे प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ए.देवकर यांनी काम पाहिले. यावेळी भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.के. एच वनंजे यांनी कृष्णविवर या वैज्ञानिक विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदर याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ.मंगेश भोसले, डॉ. गायकवाड, प्रा.कदम यांच्यासह सर्व प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

प्रदर्शनात गीतांजली करवर प्रथम पोस्टर सादरीकरणात एकूण ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पोस्टर सादरीकरणात रसायनशास्त्र विभागातील गीतांजली बालाजी करवर प्रथम, संगणक विभागातील साक्षी रमेश हुंबे द्वितीय तर गणित विभागातील वैष्णवी मल्लिकार्जुन चोले तृतीय, उत्तेजनार्थ म्हणून वैष्णवी उमेश जाधव, शिवम शरद पाटील यांना पारितोषिक देण्यात आले.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत बाळासाहेब वय ४२ वर्षे, रा. घाटंग्री ता. जि. धाराशिव यांनी दि.१९.०२.२०२६ रोजी ़.धाराशिव शहरातील सांजा वेस गल्ली येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा टिव्हीएस मोटार सायकल क्र एमएच २५ एए ५४६३ वर गुटखा पान मसाला सुपारी, आर १००० गुटखा पान मसाला,गोवा १००० असा एकुण ३५,५६० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला धाराशिव शहर पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३, २२३,२७४, २७५ अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०४ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२२ कारवाया करुन १,७४,३५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## समाज कल्याण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी सात राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी अर्ज मागविले

धाराशिव दि.४ मार्च (जिमाका) सामाजिक न्याय विभागामार्फत समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विविध राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानपूर्वक गौरविण्यात येते. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार,साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार,पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार,संत रविदास पुरस्कार,लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार,शाहु,फुले, आंबेडकर परितोषिक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या सात पुरस्कारांचा समावेश आहे.

सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांतील सात पुरस्कारांकरिता समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांनी या पुरस्कारांसाठी अर्ज सादर करावेत, इच्छुकांनी विहीत नमुन्यातील अर्ज तीन प्रतीत (स्पायरल बायडिंग न करता) दिनांक १५ मार्च २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव या कार्यालयात सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त श्री.सचिन कवले यांनी केले आहे.

## सर्व धर्म समभाव'चा संदेश देत एस एम ग्रुप साजरी करणार डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

### एस. एम. ग्रुपच्या अध्यक्षपदी निखिल मंजुळे तर उपाध्यक्षपदी सुमित साबळे यांची निवड




धाराशिव (प्रतिनिधी)- एस. एम. ग्रुप आयोजित विश्वभूषण बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी बैठक संपन्न झाली. मार्गदर्शक शंकर माने यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी निखिल मंजुळे, उपाध्यक्षपदी सुमित साबळे तर सचिवपदी खंडू आपुणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीस रोहित जाधव, समीर अरब, गौतम बनसोडे सर, कृष्णा भोसले यांच्यासह मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

एस एम ग्रुपच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, गरजू महिलांना साडी वाटप, अन्नधान्य वितरण अशा अनेक उपक्रमांचा समावेश असतो. त्याच अनुषंगाने यावर्षी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती ग्रुपचे संस्थापक मार्गदर्शक शंकर माने यांनी बैठकीत दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जयंतीदिनी भव्य अन्नदान कार्यक्रम आयोजित केला जाणार असून इंदिरानगर येथून जयंतीची मिरवणूक मोठ्या उत्साहात व शांततेत काढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. तसेच जयंती मिरवणुकीच्या आयोजनासाठी एस एम ग्रुपची कार्यकारिणीही निवडण्यात आली.

एस एम ग्रुपची जयंती सर्व धर्म समभाव या घोषवाक्याखाली साजरी केली जाते. विशेष म्हणजे दरवर्षी मंडळाच्या वतीने विविध जाती-धर्मातील युवकांना अध्यक्षपदाची संधी दिली जाते. त्यामुळे सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे धाराशिवमधील हे एकमेव मंडळ म्हणून एस एम ग्रुपकडे पाहिले जाते. यंदाही त्याच परंपरेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

### धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याची साथ

## ९ मार्च रोजी पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी व आयुष्मान-आभा नोंदणी विशेष शिबिर

धाराशिव (जिमाका) लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्हा परिषद,धाराशिवमार्फत जिल्ह्यातील सर्व प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर,आयुष्मान कार्ड व आभा कार्ड नोंदणी शिबिर तसेच विविध शासकीय योजनांबाबत माहितीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेऊन सुदृढ पत्रकारितेला बळ देण्याच्या उद्देशाने हा संयुक्त उपक्रम राबविण्यात येत आहे.

दि.९ मार्च २०२६ रोजी कै.यशवंतराव चव्हाण सभागृह,जिल्हा परिषद धाराशिव येथे हा कार्यक्रम होणार असून जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. समाजाच्या जडणघडणीत आणि शासन-जनता यांच्यातील दुवा म्हणून कार्य करणाऱ्या पत्रकारांचे आरोग्य सुदृढ राहणे ही काळाची गरज ओळखून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. पत्रकार नाव नोंदणी सकाळी १० ते सकाळी १०.३० यादरम्यान करण्यात येईल.शिबिर व कार्यशाळेचे प्रास्ताविक सकाळी १०.३० ते ११ यावेळेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष हे करतील.

पत्रकारांची आरोग्य तपासणी आयोजित शिबिरात डॉ.विक्रांत राठोड,डॉ.त्वरिता कावळे (NCD) व श्री.रवी चव्हाण (STEMI Co-ordinator) हे करतील. आयुष्मान भारत (आयुष्मान कार्ड व आभा कार्ड काढणे) सकाळी ११ ते दुपारी १ वाजतापर्यंत काढण्यात येईल.पत्रकारांचे हे कार्ड काढण्याची जबाबदारी डॉ.संतोष आहेर व श्री.सुजित पडवळ हे पार पाडतील.

जिल्हा परिषद,धाराशिवमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम तसेच शासकीय योजना याबाबत माहिती दुपारी १.०० ते २ या वेळेत विभाग प्रमुख,जिल्हा परिषद धाराशिव हे देतील.अल्पोहार व समारोप दुपारी २ ते २.३० यावेळेत होईल.

यावेळी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड असणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात येणार आहे.आयुष्मान कार्ड तयार करण्यासाठी अद्यावत शिधापत्रिका ऑनलाईन नोंद असणे तसेच आधार कार्ड आवश्यक आहे,असेही जिल्हा परिषद प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहिल्यास ऑन-द-स्पॉट नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत पत्रकार सतत धावपळ करत असतात. अनियमित दिनक्रम,प्रवास आणि ताणतणावामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते.या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणीसोबतच आरोग्यविमा योजनांची माहिती व नोंदणी सुविधा उपलब्ध करून देणे हा जिल्हा परिषद प्रशासनाचा संवेदनशील आणि दूरदृष्टीचा उपक्रम आहे.

या कार्यक्रमामुळे पत्रकारांना केवळ आरोग्य लाभच मिळणार नाही,तर शासकीय योजनांची अचूक व अधिकृत माहिती मिळणार आहे.परिणामी,ती माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होऊन सुदृढ पत्रकार आणि सक्षम समाज या संकल्पनेला या उपक्रमातून निश्चितच बळ मिळणार आहे. तरी माध्यमांच्या प्रतिनिधींनी आयुष्मान कार्ड व आभा कार्ड काढण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह या शिबिराला उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

## पदविधर मतदारांसाठी सुवर्णसंधी:०५-औरंगाबाद विभागाची अंतिम यादी जाहीर,नोंदणी सुरूच

धाराशिव दि.५ मार्च (जिमाका) भारत निवडणूक आयोगाने दि.१२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदविधर मतदारसंघाची अंतिम मतदार यादी दि.१२ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत संबंधित पदविधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणीची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवण्याबाबत आयोगाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदविधर मतदारसंघासाठी अद्याप नोंदणी न झालेल्या पात्र पदविधरांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे.

यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व पात्र पदविधर मतदारांनी आपले अर्ज संबंधित तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावेत,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.पात्र मतदारांनी या संधीचा लाभ घेऊन लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा,असेही आवाहन करण्यात आले आहे.

## धाराशिव कळंबचे आमदार कैलास पाटील यांच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य हॉलीबॉल महासंग्राम



धाराशिव (प्रतिनिधी) धाराशिव कळंबचे आमदार कैलास दादा पाटील यांच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य हॉलीबॉल महासंग्रामाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातून विविध संघांनी सहभाग घेत स्पर्धे ला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.अंतिम सामन्यात जेजुरी, पुणे येथील संघाने शानदार खेळ करत विजेतेपद पटकावले. डोरलेवाडी, बारामती संघाने द्वितीय क्रमांक, येडशी-धाराशिव (-) संघाने तृतीय क्रमांक, तर सोलापूर पोलीस, सोलापूर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रवीण भैय्या कोकाटे, श्वेता दुर्गकर, सोमनाथ आप्पा गुरव, अमित उंबरे, प्रशांत बापू साळुंखे, हनुमंत देवकते, जाधवर सर, प्रवीण केसकर, राकेश सूर्यवंशी, शिवयोगी चपणे, अभिजीत देशमुख, सत्यजित पडवळ, विश्वजीत देशमुख, मनोज पडवळ, अक्षय खळदकर, सात्विक दंडनाईक, रोहन देशमुख आदींसह अनेक मान्यवर व खेळाडू उपस्थित होते.युवासेना तालुका प्रमुख लखन बापू देशमुख व युवासेना शहर प्रमुख अभिराज कदम यांनी सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन करत भविष्यात अशा क्रीडा स्पर्धांना अधिक प्रोत्साहन देण्याचा निर्धार व्यक्त केला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बेडची येडशी-धाराशिव, घाटी, आदर्श, पोहनेर आणि जय जिजाऊ हॉलीबॉल क्लब या स्थानिक संघांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण महाराष्ट्रातून संघांनी हजेरी लावल्यामुळे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शिवाजी रा. कोरेगाववाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०४.०३.२०२६ रोजी कोरेगाववाडी येथील कोरेगाववाडी ते कोरेगाव जाणरे रोडलगत असलेल्या पत्राचे शेडसमोर अंदाजे १,०५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २१ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वन्यजीव वाचवावे लागेल

वन्यजीव वाचविण्यासाठी सर्वजनच प्रयत्न करीत असतात. वन्यजीव वाचविण्यासाठी पहिल्यांदा जंगले निर्माण केली पाहिजे. राखीव केली पाहिजेत. जंगले टिकविलीताच वन्यजीव जगली जातील. उत्पत्ती होईल मात्र विविध विकासकामांच्या नावाखाली जंगले नष्ट केल्यामुळे वन्यजीव धोक्यात आले आहे. अधिवासच नाहीसा झाल्यामुळे वन्यजीव नामशेष होत आहेत. मुळात जंगले वाचली तरच वन्यजीव वाचतील. दिवसेंदिवस मानवी वस्तीवर बिबट, वाघ, लांडगे, कोल्हे यांचे हल्ले होत आहेत. नागरि वस्तीत येत आहेत अशा बातम्या वाचण्यात येतात. हे वन्यजीव जंगल, वन, अभयारण्य सोडून बाहेर आले कसे? याची वन विभागाने शास्त्रीय चिकित्सा केली पाहिजे. जेव्हा वन समृद्ध होतील तेव्हा वन्यजीवांचे आश्रयस्थान निश्चित होईल. अन्यथा मानवी वस्ती हीसुद्धा त्यांची वस्ती असेल हे आज वास्तव आहे. भारत हा उष्ण कटिबंधीय प्रदेश असल्याने तीन्ही ऋतूंचे वैशिष्ट्ये महत्त्वपूर्ण आहे. ऊन्हाच्या झळांमुळे जंगल, वन व डोंगर, टेकडी माथ्यावरील वाढलेले गवत, इतर लहान झुडपे वाळली आहेत. सध्या अनेक डोंगर रांगाना आगी लागत आहेत. यात अनैसर्गिक व नैसर्गिकरीत्या वणवे लागून जंगले, त्यातील उपयुक्त वनस्पती, औषधी वनस्पती, पशु, पक्षी, कीटक, नष्ट होत चालले असून ते रोखण्यासाठी केवळ वनविभाग जबाबदारी पेलू शकत नाही. नागरी सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. वणवा लागण्याबाबत अनेक लोकांत व डोंगर दऱ्यात राहणाऱ्या रहिवाशांमध्ये गैरसमज असतात. ते अनेक वर्षानुवर्षे तसेच आहेत. एक अंधश्रद्धा निर्माण केली जाते, आग लागल्याने नवीन गवत कुरण चांगले वाढते, हिरवळ मोठ्या प्रमाणात वाढते, झाडांना चांगली पालवी फुटते, पुढील हंगामात तेंदूच्या पानांचा आकार वाढावा म्हणून गडचिरोलीसारख्या भागात कृत्रिम वणवे लावतात, जंगलात वावरणे व शिकार करणे सोपे जाते अशा काही भाकड कारणांमुळे जंगलामधील नव्याने उगवण झालेली झाडे, झुडपे, पक्ष्यांची घरटे, अंडी, नवजात पिल्ले, सरपटणारे प्राणी आगीत होरपळले जातात. ही एक वस्तूस्थिती आहे ती दुर्लक्षित करता येत नाही. वन्यजीव मानवी वस्तीकडे का येऊ लागले हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ९ डिसेंबर व २२ डिसेंबर २०२० रोजी पुण्यात रानगवा आला कसा? गवा हा प्राणी हिंस्र नसून तो गवत खात असल्याने तो तसा समुहाने राहणारा, लाजाळू स्वरूपाचा आहे. त्यास गायी-म्हशींच्या शिंगांसारखीच शिंगे असतात. सहसा इजा न करणारा पण हल्ला झाल्यावर, गोंधळ झाल्यावर सैरभैर होऊन जातो. तेच त्याच्या बाबतीत घडले. वन्यपशू, पक्षी मानवीवस्तीकडे कसे आले व ते पुन्हा नैसर्गिक अधिवासात कसे जातील याचे प्रात्यक्षिक नागरिकांना माहीतच नसल्याने बघ्यांची गर्दी त्यात फोटो काढण्यासाठी सरसावलेले मोबाइल, नागरिकांचा गोंधळ, गर्दी, सिमेंटच्या जंगलातून वाट काढीत वाट फुटेल त्या मार्गाने तो पळत सुटला. सातशे किलो वजनाच्या जवळपास असलेला हा जीव एकदाचा दमला. त्यात सहा तास हूल देऊन, झुंज देऊन अखेर त्याने जीव सोडला. त्यानंतर अनेकांचे प्राणीप्रेम उफाळून आले होते. नको त्या चर्चा रंगल्या होत्या, त्याच्या माफीचे बॅनरही लागले होते. अशा मंडळींनी कधी वन्यपशू, पक्षी संवर्धनाबाबत एक पाऊल उचलले नसते. मात्र प्राणी मात्रावर प्रेम करायला कधी शिकणार हा प्रश्न प्रत्येकाने आपल्या मनाला विचारला पाहिजे. वन, अभयारण्य तसेच माळरानाची समृद्धता वाढवणे, त्यांची संख्या वाढवणे हे दोन मूळ उद्देश ठेवून वन्यजीव संवर्धनाकडे पाहिले पाहिजे. जंगलांचे रुपांतर विकासाच्या नावाखाली सिमेंटच्या जंगलात होत गेले. वाढत्या शहरीकरणामुळे शहराच्या लगतचे जंगल नष्ट होत गेले. अशा परिस्थितीत वन्यजीव राहणार तरी कुठे? ते मानवी वस्तीकडे अतिक्रमण करणार हे स्वाभाविक आहे. विकासाच्या नावाखाली वन्यजीवांच्या अधिवासावर कधी घाला घातला गेला हे लक्षातच आले नाही. सध्या बदलत्या हवामानामुळे, विकासाच्या नावाखाली अफाट जंगल तोड त्यामुळे वने, डोंगर, दरी व रानातील जैवविविधता नष्ट झाली. त्यामुळे अन्नसाखळी तुटली. अन्न व पाणी शोधात भटकंती करत कधी मृत्यूला सामोरे जात तर कधी शेतपीक, पशुधनावर हल्ले होऊ लागले. जंगलातील पशू, पक्षी त्यांचा अधिवास सोडून मानवी वस्तीकडे अतिक्रमण करू लागले. हे अलिकडे दिसून येत आहे. समृद्ध वने निर्माण करताना अन्नसाखळी टिकवण्यासाठी तसेच वन, जंगलातील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी नियमावली आवश्यक आहे. भारतात दरवर्षी १४ लाख हेक्टर जंगलतोड होते. त्यामुळे जंगल विकासात स्थानिक नागरिकांनी व स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला पाहिजे. तर भविष्यात मानवी वस्तीवरील अतिक्रमण रोखण्यात यश येईल. हिंस्र पशू वन सोडून बाहेर कसे येऊ लागले याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. वारंवार लागणाऱ्या वणव्याने अनेक औषधी व चारायुक्त वनस्पती जळून नष्ट झाल्या. मृत झालेले सरपटणारे प्राणी, रानससे, घोरपड, माकड, रानडुक्कर, मुंगूस, खार, शेखरू खार, खवले मांजर, साळींदर, हरणांचे कळप असे प्राणी झपाट्याने नाहीसे होत आहेत हे वन्यप्रेमींनी लक्षात घेतले पाहिजे. या प्राण्यांवर जगणारे बिबट, वाघ, लांडगा, तरस व कोल्हा हे प्राणी जंगल सोडून मानवी वस्तीकडे येऊ लागले. मानवी वस्तीमध्ये संचार करताना रस्ते, विहीर, कुंपण यातील अपघात, शिकार व उपासमारीमुळे अनेक प्राण्यांचे दरवर्षी मृत्यू होतात. वन, जंगल, डोंगरमाथ्यावरून जाणारे रस्ते, प्रकल्प अशा विकास योजनांमुळे १२० वनौषधी वनस्पती संकटग्रस्त झाल्या आहेत. असा जंगलावरील मानवी अतिक्रमणाचा विळखा घातकच ठरणार आहे. हे चक्र नाहीसे करावयाचे असेल, तर वन्यजीव संवर्धनासाठी आणि वनसंपदा राखण्यासाठी लोकसहभाग हा हवाच आहे. आता कॉंक्रेटच्या जंगलास आळा घातला पाहिजे. कोणत्याही परिस्थिती वनविभाग वाढला पाहिजे. तरच शुद्ध ऑक्सीजन मिळणार आहे. जंगले असतील तर गुणकारी वनऔषध तसेच प्राणी जगतील. त्याच प्रमाणे वनभाग असने राज्याचे भुषण आहे. त्यामुळे वने नष्ट न करता संवर्धन होणे अपेक्षित आहे याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. वनसंपली तर संकट अटळ आहे. कोणत्या स्वरूपाचे संकट येतील ते त्यावेळी कळाल्यास वेळ संपलेली असेल हे लक्षात घेतले पाहिजे.

# दयानंद विज्ञानच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची लोणार विवरास भेट





**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी लोणार विवरास दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी भेट दिली.या भेटी दरम्यान लोणार विवराचा बारकाईने अभ्यास केला.तो असा की,लोणार विवर ही एक अद्वितीय प्रभाव रचना आहे. पृथ्वीवरील बेसाल्टमधील एकमेव मोठे प्रभाव विवर ज्यामध्ये असामान्य सोडा सरोवर आहे.लोणार विवर सुमारे ६५ दशलक्ष वर्षे जुन्या डेक्कन ट्रॅप बेसाल्टमध्ये तयार झाला आहे. येथे बेसाल्टचा थर सुमारे ४०० मीटर जाड आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की, सुरुवातीला हे विवर सुमारे २३० – २४५ मीटर खोल होते, परंतु आता ते १५० मीटरपेक्षा कमी खोल आहे.विवराचा आकार किंचित अंडाकृती आहे, ज्याचा व्यास १,८०० मीटर आहे. विवराचे आतील उतार ५–२५ तीव्र आहेत. लोणार विवराला वेगळे, उंच कडा आहेत आणि ते दृश्यमानपणे पृथ्वीवरील सर्वात प्रमुख प्रभाव विवरांपैकी एक आहे.उल्कापाताचा आघात– काही काळासाठी तज्ज्ञांचा असा विश्वास होता की,हे विवर ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे निर्माण झाले आहे.परंतु आता हे सिद्ध झाले आहे की,उल्कापिंडाचा आघात हे त्याचे कारण आहे. फेल्डस्पार, शंकूच्या तुकड्यांच्या कणांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण प्लॅनर विकृत रचना आढळून आल्या आहेत. विवराभोवती इजेक्टा ब्लँकेट आहे – ढिगाऱ्याचा थर, जो आघातानंतर जमिनीवर पडला. टेक्टाइट्स – वितळलेल्या सिलिकाचे तुकडे – देखील सापडले आहेत.उल्कापिंड बहुधा पूर्वेकडून आला असावा, तो ३०–४५ कोनात जमिनीवर आदळला असावा. पूर्वी, थर्मोल्युमिनेसेन्स विश्लेषणाच्या डेटाच्या आधारे, असे मानले जात होते की, उल्कापिंड ५२ हजार वर्षांपूर्वी पडला होता. अलीकडच्या अभ्यासात ४० / ३९ विश्लेषणात वेगळे वय दिसून आले आहे – ५७०,००० ४७,००० वर्षे (१, २). ही पद्धत अधिक विश्वासार्ह वाटते, तसेच ५०,००० वर्षांच्या कालावधीत विवर खूप जास्त क्षीण झालेला दिसतो.बेसाल्टिक खडकात पूर्णपणे तयार झालेला हा एकमेव इम्पॅक्ट क्रेटर आहे.लोनाड क्रेटरच्या संशोधनातून मंगळासारख्या ग्रहांवर उल्कापिंडाच्या आघाताच्या परिणामांबद्दल मौल्यवान माहिती मिळते.

अंबर सरोवर – आणखी एक आघातजन्य विवर?– लोणार विवराच्या उत्तरेस ७०० मीटर अंतरावर एक छोटा विवर आहे – अंबर सरोवर विवर (छोटा लोणार). अंबर सरोवर देखील अंडाकृती आकाराचे आहे, २५० – २९० मीटर व्यासाचे आहे, त्याच्याभोवती अंदाजे ६ मीटर उंच कडा आहे. सरोवर कडाच्या खाली सुमारे ५ मीटर अंतरावर आहे. जरी असा अंदाज आहे की,हे लहान विवर मोठ्या विवरातील ढिगाऱ्यांमुळे तयार झाले असावे, परंतु बहुधा ते उल्कापिंडाच्या दुसऱ्या तुकड्याने तयार झाले असावे – अशा प्रकारे हे आणखी एक परिणाम करणारे विवर आहे.

लोणार सरोवर– मोठ्या विवरात, विवराच्या कडा खाली १३७ मीटर अंतरावर एक अद्वितीय सरोवर आहे – लोणार सरोवर. या उथळ सरोवराचा व्यास १.२ किमी आहे. सरोवराचे वेगळेपण खालील घटकांद्वारे निश्चित केले जाते: हे जगातील एकमेव सरोवर आहे, जे बेसाल्टिक उल्कापिंडाच्या विवरात स्थित आहे; उंच खड्ड्यांचे कडा वाऱ्याच्या प्रभावापासून सरोवराचे संरक्षण करतात, सरोवराचे वेगवेगळे भाग मिसळत नाहीत, सरोवराच्या खोऱ्यात वाढीव आर्द्रता आणि तापमानाची स्वतःची व्यवस्था असते. लोणार सरोवर हे खारट सोडा सरोवर आहे ज्यामध्ये विरघळलेल्या कार्बोनेटचे प्रमाण जास्त आहे. सरोवराच्या खारटपणात चढ–उतार होत असतात – कोरड्या काळात सरोवराची पातळी कमी होते आणि खारटपणा वाढतो, पावसाळ्यात पातळी वाढते आणि पाणी कमी खारट असते. सरोवराच्या काठाजवळ अनेक गोड्या पाण्याचे झरे आहेत – यामुळे आणि पावसाच्या लहान प्रवाहांमुळे किनाऱ्याजवळील पाणी कमी खारट असते. किनाऱ्याजवळील पाण्याचा तटस्थ असतो – ७, परंतु मध्यभागी पाणी खूप खारट असू शकते आणि ११ पर्यंत पोहोचू शकते.

असामान्य परिसंस्था– सरोवरातील प्रत्येक झोनची स्वतःची परिसंस्था असते. मध्यभागी असलेले जीवन अधिक असामान्य आहे – अल्कधर्मी झोनमध्ये, जिथे विशिष्ट सूक्ष्मजीव राहतात, उदा. हॅलोमोनास स्प., पॅराकोकस स्प. क्लेब्सिएला स्प., स्लॅकिया स्प. ॲक्टिनोपॉलिस्पोरा स्प.. यापैकी काही सूक्ष्मजीव फक्त अतिशय अल्कधर्मी वातावरणात टिकू शकतात आणि अजैविक वातावरणातही टिकू शकतात. हे सूक्ष्मजीव वातावरणातील नायट्रोजन स्थिर करण्यास सक्षम आहेत.या सरोवराचा बाह्य भाग भारतातील सरोवरांमधील सामान्य रहिवाशांसाठी अधिक अनुकूल आहे – येथे असंख्य समुद्रकिनारी फिरणारे पक्षी दिसतात, किनाऱ्यावर सरडे, हरिण आणि इतर प्राणी दिसतात. अनेक शतकांपासून स्थानिक लोक सरोवरातून क्षार काढत आहेत. या सरोवराच्या उतारांनाही स्वतःची विशिष्ट परिसंस्था आहे. सरोवराभोवती क्षारीय चिखलाचा पट्टा आहे, जो पावसाळ्यात पाण्याखाली जातो. पुढे बाभळीच्या झाडांचा पट्टा वाढवतो आणि नंतर चिंचेची झाडे, सागवान आणि इतर झाडांनी जंगल सुरू करतो.

लोणार सरोवर हे एक अद्वितीय हायपरसॅलाइन आणि हायपरअल्कलाइन आहे क्रेटर सरोवर ज्यामध्ये एक वेगळा, वैविध्यपूर्ण सूक्ष्मजीव समुदाय आहे ज्याचे वर्चस्व आहेप्रोटीओबॅक्टेरिया , ॲक्टिनोबॅक्टेरिया , फर्मिक्युट्स आणि सायनोबॅक्टेरिया. हे हॅलोअल्कॅलिफिलिक एक्स्ट्रीमॉफिल्ससाठी एक हॉट स्पॉट आहे, ज्यामध्ये मिथेनोजेन, मिथाइलोट्रॉफ्स आणि सल्फर–ऑक्सिडायझिंग बॅक्टेरियाचा समावेश आहे. हे सूक्ष्मजंतू जैवतंत्रज्ञानदृष्ट्या मौल्यवान आहेत, जे सेल्युलेसेस, अमायलेसेस आणि लिपेसेस सारखे एंजाइम तयार करतात.

सदरील सहलीसाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे यांनी परवानगी दिली व तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे व प्रा. अनुराधा इंगळे व शिक्षकेत्तर कर्मचारी माधव सूर्यवंशी यांनी सहलीत सक्रिय सहभाग नोंदविला. या सहलीत एकूण २८ विद्यार्थी सहभागी होते, ही सहल यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी विभागातील डॉ. महेश करळे, डॉ. दीप्ती ढेरे, प्रा. शितल पाटील (पदव्युत्तर समन्वयक), प्रा. शैलजा धुतेकर, प्रा. संध्या टेकाळे, प्रा. राधिका मालू व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# वडजूराम गोपाळघरे सनदी लेखापाल यांचा आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



**लातूर/प्रतिनिधी :** वयाच्या २१ व्या वर्षात पहिल्याच प्रयत्नात शेतकरी पुत्र वडजूराम रामहरी गोपाळघरे यांनी सनदी लेखापाल परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. या यशाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले आहे.

लातूर येथील रेणुका नगर भागात राहणारे रामहरी गोपाळघरे यांचे चिरंजीव लहानपणापासूनच शिक्षणाची आवड असलेल्या वडजूराम गोपाळघरे यांनी अवघ्या वयाच्या २१ व्या वर्षी सनदी लेखापाल परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरित्या उत्तीर्ण होण्याचे यश संपादन केले आहे . या यशाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, वडजूराम यांचे बंधू ज्ञानेश्वर गोपाळघरे, अभिजीत गोपाळघरे आणि त्यांच्या भगिनी प्रियंका गोपाळघरे यांच्यासह अनेक जण होते.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असलेल्या मौजे नांदुरघाट येथील शेती व्यवसाय करणारे गोपाळघरे कुटुंब गेल्या काही वर्षापासून लातूर येथे स्थायिक आहे. शालेय शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत घेतलेल्या वडजूराम गोपाळघरे यांनी मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायी असून या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# दयानंद विज्ञानमध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी कशी सुरु करायची या विषयावर अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

सकाळ स्टडीरूम ग्रेट भेट समारोह ; प्रशासकीय प्रवासातील प्रेरणा व प्रक्रियेचा संगम साधत विद्यार्थ्यांनी यशस्वी अधिकारी वर्गांशी साधला सुसंवाद









**लातूर/प्रतिनिधी :** स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनात प्रशासकीय सेवेबद्दलची ओढ निर्माण व्हावी आणि त्यांना यशाचा अचूक मार्ग मिळावा या उद्देशातून दि.०५ मार्च २०२६ रोजी सकाळ प्लस स्टडीरूम व दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय प्रवासातील प्रेरणा आणि प्रक्रियेचा संगम घडविणारा स्पर्धा परीक्षांची तयारी कशी सुरू करायची या विषयावर उद्बोधनपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.या कार्यक्रमासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांचेही प्रोत्साहन मिळाले.या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, सिनियर फॅकल्टी श्रीकांत जाधव, ॲड.वैभव खुपसे, गटविकास अधिकारी सुरज गावडे, डी.वाय. एस.पी.सौरभ सुरवसे, कार्यक्रम व्यवस्थापक सकाळ माध्यम समूहाचे आदित्य वैशंपायन, यीन सकाळचे वरिष्ठ अधिकारी अमर साखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.रवींद्र शिंदे, डॉ.संगीता जाजू, डॉ.रामशेट्टी शेटकार, पत्रकार गणेश स्वामी, डॉ.रोहिणी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सौरभ सुरवसे यांनी एमपीएससी,यूपीएससी अशा स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी कष्ट, मेहनत व भरपूर अभ्यास केले पाहिजे.पदवीचे शिक्षण घेत असतानाच मोठी स्वप्ने पाहिले पाहिजेत.ती स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी वेळेचे नियोजन करून मार्गक्रमण केले पाहिजे हे सांगत असताना त्यांनी आपला प्रशासकीय प्रवास,त्यातील आव्हाने आणि या पदाच्या माध्यमातून समाजात घडवता येणारा बदल यावरही त्यांनी प्रकाश टाकले. सुरज गावडे यांनी जीवन हे संघर्ष असून प्रत्येकांनी आपल्या आयुष्याच्या कठीण परीक्षेत नेहमी उंच शिखर गाठले पाहिजे.यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी जीवनात निश्चित ध्येय,मजबूत पाया, कामाचे प्लॅनिंग, सातत्य, हार्ड वर्क व अपयशावर मात करण्याची धमक ठेवली पाहिजे असे त्यांनी सांगितले.ॲड.वैभव खुपसे यांनी दयानंद शिक्षण संस्था ही नावाजलेली शिक्षण संस्था असून या संस्थेने व महाविद्यालयाने अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले आहेत.हाच वारसा जपत विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून करिअर घडविले पाहिजे.लेखन,वाचन, श्रवण व संभाषण कौशल्य वृद्धिंगत केले पाहिजे.लिहिणे व वाचण्याला वय नसते.आयुष्यभर आपण विद्यार्थीच असतो आणि आपण स्वतःला घडविले पाहिजे असे त्यांनी सांगितले.श्रीकांत जाधव यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विशिष्ट ध्येय निश्चित करून यशस्वी जीवनाची वाटचाल केली पाहिजे असे सांगून परीक्षेचा बदलता ट्रेंड, एमपीएससीची नवीन वर्णनात्मक पद्धत व त्या अनुषंगाने लेखनाचा सराव कसा करावा हे सांगितले.त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेतील मराठी टक्का वाढावा अशीही त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

प्रास्ताविकातून प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व त्याची तयारी कशी करावी आणि भावी काळात दयानंदचे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून घडले पाहिजेत या उद्देशातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असे त्यांनी सांगितले तर आभार डॉ. रामशेट्टी शेटकार यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.अरुणा चौधरी यांनी केले.

कार्यक्रमाचे स्वरूप अत्यंत नेटके आणि मार्गदर्शक होते. ग्रेट भेट उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ अधिकाऱ्यांच्या यशोगाथाच मांडल्या गेल्या नाहीत, तर बदलत्या परीक्षा पद्धतीनुसार अभ्यासाची रणनीती कशी असावी, याचा रोडमॅप देखील विद्यार्थ्यांना देण्यात आला.मराठी टक्का वाढवण्यासाठी सकाळ माध्यम समूहाचा हा उपक्रम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरत आहे. दर आठवड्याला प्रकाशित होणाऱ्या डिजिटल ई–पेपरच्या माध्यमातून एमपीएससी व यूपीएससीचा सराव आता मराठीतून करणे सोपे झाले आहे. केंद्रीय सेवांमध्ये मराठी अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढवणे आणि बदललेल्या परीक्षा पद्धतीनुसार दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे मुख्य ध्येय होते.व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी दिलखुलास उत्तरे दिली, ज्यामुळे अनेक शंकांचे निरसन झाले. हा उपक्रम केवळ अधिकारी होण्याचे स्वप्न दाखवत नाही, तर ते स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी प्रेरणा आणि प्रक्रिया यांचा मेळ घालून विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग सुकर करतो.याप्रसंगी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# युद्ध आणि सामान्य देशांना आर्थिक चटके

एका सार्वभौम देशाच्या सर्वोच्च नेत्याची परक्या देशाने हत्या करणे ही गंभीर बाब आहे. त्या बद्दल केंद्र सरकारने प्रतिक्रिया का दिली नाही ते कळत नाही. या युद्धाने भारतासमोर आर्थिक व राजकीय संकट उभे केले आहे.
पश्चिम आशियात पुन्हा एकदा युद्ध भडकले आहे. ते कधी थांबेल ते सांगता येत नाही. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी ते वर्षानुवर्षे चालणार नाही; पण काही काळ चालेल असे म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना ते लवकर संपवण्याची इच्छा दिसत नाही. आमच्याकडे शस्त्रांचा अमर्याद साठा आहे, त्यामुळे अनंत काळ युद्ध चालू शकते असे ते म्हणाले आहेत. संघर्ष आणि युद्धे यांच्या आधारे अमेरिकेतील शस्त्रास्त्र उद्योग आणि देश पैसा मिळवतात. आखातातील सशस्त्र संघर्षांचा अमेरिकेवर थेट परिणाम होत नसला तरी इतर देशांवर परिणाम होतो. अमेरिकेला थोड्या काळाने तो जाणवेल हे नक्की. त्यांचे सहा सैनिक या युद्धात मारले गेले आहेत आणि ङ्गआणखी काही जणफप्राण गमावतील असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. जगावर सत्ता गाजवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. ती प्रत्यक्षात आणताना आपले काही नागरिक मारले गेल्याचे त्यांना दु:ख होणार नाही. पश्चिम आशियापासून दूर असणार्या देशांना या युद्धाचे अनेकविध त्रास भोगावे लागतात. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. त्यामुळे युरोप, अमेरिका, कॅनडा आदी देशांना निर्यात कशी करायची असा प्रश्न भारतासह अनेक देशांपुढे उभा राहिला आहे. खनिज तेलाची आयात ही दुसरी गंभीर समस्या आहे. आर्थिक, राजकीय पेच अमेरिका व इस्रायलने इराण- वर हल्ला केल्याचे वृत्त समजताच जगातील शेअर बाजार कोसळले. खनिज तेलाचे दर काही तासांत सुमारे ८ टक्क्यांनी वाढले. प्रमुख प्रकाराच्या तेलांचे दर ७६ ते ८३ डॉलर्स प्रति पिंप झाले. गेल्या महिन्यात भारत सरासरी ६९ डॉलर्स प्रति पिंप या दराने खनिज तेल खरेदी करत होता. आता तेलावर देशास जास्त परकीय चलन खर्चावे लागेल. निर्यात घटल्यास ते कोठून येणार हा प्रश्न आहे. निर्यातीस तयार असलेला २ लाख टन बासमती तांदूळ बंदरांमध्ये अडकला आहे. तेवढाच प्रवासात आहे; पण सागरी मार्ग बंद झाल्याने जहाजे अडकली आहेत. भारतातून दर वर्षी सुमारे ४० लाख टन बासमती तांदळाची आखाती देशांना निर्यात होते. युद्धामुळे त्याला जबर फटका बसणार हे निश्चित आहे. कापड व कपडे यांची भारतातून सुमारे ३७ अब्ज डॉलर्सची निर्यात होते. आखाती देशांत हजारो कोटींची वस्त्र प्रावरणे निर्यात होतात. हा मालही बंदरांमध्ये व प्रवासात अडकला आहे. फळे, भाज्या व मासळी आदी सागरी उत्पादने यांचीही भारतातून मोठी निर्यात होते. सध्या रमझानमुळे आखाती देशांतून फळांना मोठी मागणी आहे. मात्र त्याची निर्यात अनिश्चित बनली आहे. हा नाशवंत माल असल्याने तो फेकून देण्याची वेळ निर्यातदारांवर येण्याची भीती आहे.
होर्मुझचे आखात निर्यातीच्या दृष्टीने पाश्चात्त्य देशांसाठीही महत्त्वाचे आहे. ते बंद झाल्याने जागतिक व्यापारावर परिणाम होणार आहे. युद्धामुळे जहाजांतून माल वाहून नेण्याचे दर भडकले आहेत. त्याचा फटका भारतासह सर्व देशांना बसणार आहे. देशात खनिज तेल व पेट्रोल-डिझेल यांचा पुरेसा साठा असल्याचे सरकारने म्हटले आहे. मात्र युद्ध तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ चालल्यास पेच निर्माण होऊ शकतो. रशियाकडून खनिज तेल घेण्याचा पर्याय असला तरी त्यामुळे पुन्हा ट्रम्प भारतावर जादा शुल्क लादण्याची भीती आहे. या युद्धाचा महागाईवर किती परिणाम होतो ते पुढे येण्यास काही काळ जावा लागेल. अनिश्चित परिस्थितीमुळे उद्योगांची गुंतवणूक मंदावेल तसेच मागणीवरही परिणाम होईल. यामुळे विकास दर मंदावण्याचा धोका आहे. युद्ध लांबल्यास निर्यात प्रधान क्षेत्रांमध्ये कामगार कपात होण्याचा धोका आहे. त्याचे सामाजिक परिणाम गंभीर ठरू शकतात. महागाई व रोजगार या आघाड्या सांभाळणे केंद्राला आव्हानात्मक बनणार आहे. नव्या युद्धाने भारतासमोर आर्थिक आणि राजकीय पेच उभा केला आहे. इराण, इस्रायल हे दोन्ही देश भारताचे मित्र आहेत, अमेरिकेशी चांगले संबंध ठेवणे ही सरकारची अपरिहार्यता आहे. कोणालाच दुखावता येत नसल्याने नेमकी भूमिका ठरवणे सरकारसाठी अवघड बनले आहे. युद्धाचे चटके लवकरच जाणवू लागतील.

# गुण हीच महानता असते



एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्ववतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले.
स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने म हान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

यामागे मुख्यत्वे ताणतणाव, अनियमित जीवनशैली, अति कॅफिन (कॉफी/चहा) सेवन, रात्री उशिरापर्यंत मोबाईलचा वापर आणि झोपण्याच्या जागेत अस्वच्छता किंवा गोंधळ ही कारणे आहेत. तसेच, चिंता, नैराश्य, शारीरिक वेदना, किंवा रात्रीची अनैच्छिक जाग हे देखील महत्त्वाचे घटक आहेत १, ८, १०.
झोप मांडवणे (झोप न लागणे) ची प्रमुख कारणे:
मानसिक ताण आणि चिंता: कामाचा ताण, नैराश्य किंवा अतिविचार (जींशींींहळपज्ञळपस) ४, १०.
अनियमित झोपेचे वेळापत्रक: रोज एकाच वेळी न झोपणे किंवा शिफ्ट ड्युटी १, १०.
जीवनशैलीत बदल: संध्याकाळच्या वेळी जास्त व्यायाम करणे किंवा दिवसा जास्त झोपणे १, ८.

## झोप न लागणे (निद्रानाश)

आहार आणि पेय: रात्री उशिरा जेवणे, चहा-कॉफी (कॅफिन) किंवा अल्कोहोलचे जास्त सेवन १, ६.
इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स: झोपण्यापूर्वी मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्हीचा अतिवापर, ज्यातील 'ब्लू लाईट' झोपेच्या संप्रेरकांमध्ये अडथळा आणते ८, १०.
शारीरिक आजार: तीव्र वेदना, श्वास घेण्यास त्रास (स्लीप प्निया), किंवा थायरॉईडसारखे आजार ४.
वातावरण: झोपण्याची खोली खूप गरम असणे, प्रकाश जास्त असणे किंवा आवाज होणे ८.
झोप सुधारण्यासाठी उपाय:
नियमित व्यायाम करा (पण संध्याकाळी नाही), रात्री मोबाईलपासून दूर राहा, चहा-कॉफी टाळा आणि झोपण्यासाठी शांत व गडद खोली वापरा



# उपदेशकथा: मान-अपमानाचा अभ्यास

परमाचार्यांचा एक शिष्य म्हैसूरच्या न्यायालयामध्ये मुख्य न्यायाधीश होता. गरिबीतून कष्ट करून जीवनात यशस्वी झालेला तो माणूस शंकराचा भक्त होता. ओम् नम: शिवाय या मंत्राचा पाच हजार जप केल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. त्याला ईश्वरदर्शनाची खरी ओढ होती. निवृत्त झाल्यावर तो आपल्या गुरूकडे गेला आणि आता मला ईश्वरदर्शनाचा मार्ग सांगा असे म्हणाला. गुरू म्हणाले, मी मोठा न्यायाधीश होतो हे आधी विसरा. ते विसरण्यास काय करायला हवे ते सांगा असे म्हटल्यावर गुरू म्हणाले, जेथे आपल्याला कोणी ओळखत नाही अशा ठिकाणी जाऊन भीक मागा. गुरू आज्ञेप्रमाणे तो न्यायाधीश घर सोडून द्वारकेला गेला. तेथे श्रीकृष्णाच्या मंदिरासमोर तो भिकारी लोकांच्या रांगेमध्ये बसून भीक मागू लागला. कमरेला एक पंचा, खांद्यावर एक टॉवेल व हातामध्ये एक पत्र्याचा डबा असा त्याचा अवतार होता. म्हैसूर सरकारचे गोपाळस्वामी नावाचे एक शिक्षणाधिकारी मे महिन्याच्या रजेमध्ये द्वारकेला गेले. श्रीकृष्णाच्या दर्शनाला जाताना त्यांनी या भिकाऱ्याला पाहिले. आपण या माणसाला कुठेतरी पाहिले आहे असे त्यांच्या मनात आले पण बरोबर आठवेना. बारा वाजता मंदिर बंद झाले व भिकारी उठून जाऊ लागले. गोपाळस्वामी त्या जज्जाच्या मागे गेले. जज्ज आपल्या खोलीवर गेला. खोलीचे कुलूप काढता काढताच गोपाळस्वामींनी ओळखले. नमस्कार करून त्यांना विचारले, हे असे का? जज्ज म्हणाला, माझ्या मनातील मोठेपणाची भावना नाहीशी करण्यासाठी गुरूने हे करायला सांगितले. मग ते साधले का असे विचारल्यावर जज्ज मी मोठा जज्ज होतो हे मी खरेच विसरलो. पण लोकांजवळ भीक मागताना अजून मला खऱ्या भिकाऱ्याची लाचारी येत नाही. मला पेन्शन आहे हे विसरणे कठीण जाते.

**कथा उपदेश : व्यवहारात अहंभाव विसरणे कठीण असते.**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




चांगले अन्न ग्रहण केले तर नक्कीच आपली त्वचा संदर चला तर पाहुया चांगल्या त्वचेकरता तुम्हाला कोणत्या गोष्टींचे सेवन करायला हवे.
**त्वचेकरता काय खावे?** -पाणी-आपल्या त्वचेला तुकतुकीत, लवचिक आणि कोरडे होण्यापासुन वाचवण्याकरता त्वचेला रोज मॉश्चराइझ करणे आवश्यक आहे. जर तुम्ही पुरेश्या प्रमाणात पाण्याचे सेवन केले नाही तर लवकरच तुमची त्वचा थकलेली आणि कोरडी दिसायला लागते. आपल्यातील बरेच लोक दिवसात बरेचदा कॉफी चे सेवन करत असतात आणि खुप कमी लोक पुरेश्या प्रमाणात पाणी पितात. जर आपण स्वस्थ होईल. **(क्रमशः)**

## २ Joke विनोद




रडणाऱ्या बाळूला जवळ घेत आईने विचारले, काय झाले रे? का रडतोयस? खो खो खेळताना गुडघ्याला मार लागला. बाळू डोळे पुसत म्हणाला, पण खेळ संपून तर बराच वेळ झाला. हो, खेळताना रडायला वेळच मिळाला नाही. बाळू म्हणाला.

## ३ Message संदेश



Santa Ki Biwi : O ji Car ki speed itani kyo badha di..?
Santa : Are Banoo Car ki break fail ho gayi hai, To accident ho jaye iske pehele ghar pahunch jaate hai.


## ४ Thought सुविचार



अधिकाराशिवाय इच्छाशक्ती म्हणजे पोरांनी चालविलेला सैनिकांचा खेळ.
- जी. कॅनिंग

**संस्कृत सुभाषित**
शुकवद् भाषणं कुर्याद्, बकद्ध्यानमाचरेत।
अर्जवच्चर्वणं कुर्याणं, गजवत्स्नानमाचरेत्।।
अर्थ
पोपटासारखे (स्पष्ट) बोलावे, बगळ्यासारखे ध्यान लावावे, शेळी व बकरीप्रमाणे चर्वण करावे तसेच हत्तीप्रमाणे (मनसोक्त) स्नान करावे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. गुन्हा
५. करमणूक करणारे
८. सडपातळ
११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी!
१२. गुजराथी नृत्य प्रकार
१४. वर्तुळ
१६. भरभराट
१९. मुरली, बासरी
२०. धोबी
२१. सैन्यातील एक हुद्दा
२३. घागरा
२४. बर्फाचा पर्वत
२५. अभय देणे
२७. श्रीमंत
२८. वहिवाट, शेत
२९. संपणे
३०. चुकीचे
३१. करार, भिस्त
३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी
३५. स्वच्छ
३७. घर
३९. विपत्तीची कहाणी
४१. कणसातील दाणे
४३. सज्जनगडचे संत
४४. सार, अर्थ
४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी
४६. वर-वधू
४८. सरहद्द
४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला
५३. युद्ध
५५. लहान
५६. वेल
५८. जादू, भ्रम
५९. बाळाची बोलगाणी
६३. अतिशय हाल
६५. पावसाची झड
६६. राज्यघटना (हिंदी)
६७. गेरु
६८. पडते घेणे
७०. माया, प्रेम
७१. विविध
७३. संध्याकाळ
७४. हनुमान
७५. झकास, सुंदर
७६. राजकारणी यात्रा!
७७. रड्या माणूस
७८. मौल्यवान साठा

## उभे शब्द

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत
२. राजाचा कालावधी
३. मोठ्ठीच गंमत,४. ऐट, दिमाख
५. वर्ण,
६. सोन्याचा धागा
७. '--- में हड्डी'
८. रस्ता, पर्थ
९. जिवलग मित्र
१०. समशेर
१३. लोकांचा समूह
१५. नवरा
१७. रत्न
१८. सूर्य, तापविणारा
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. सामान
२४. थंडीचे दिवस
२५. प्राण
२६. आशीर्वाद
२७. सावकार, श्रीमंत
२८. उत्तराधिकारी
२९. शाब्दिक हजामत
३२. दरवाजा
३३. हालचाल
३४. खरकट्याची रास
३६. पळून गेलेला
३८. हिंदीत दहा
४०. ओटा
४२. कर्ण
४४. तमाशा कलाकार
४७. उगाच भटकणे
४९. हस्त
५०. सर्वस्व
५१. भोळा (शंकर)
५२. लोखंडी वस्तूवरील गंज
५४. अभिप्राय
५७. चंद्र
५८. ममता, प्रेम
६०. डोंगर उतरण, ढाळ
६१. डासाचे चावणे
६२. गीत
६४. मिठी
६६. अनुमती, मान्यता
६८. टक, दृष्टी
६९. सहाय्य
७०. वारा
७१. बाई, स्त्री
७२. श्वान
७४. मुलांच्या भाषेत मांजर
७५. सिंहाचे पिल्लू

## आडवे उत्तर

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दारामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

## उभे उत्तर

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा



# क्रीडा विश्व






## थोडक्यात/ संक्षिप्त

### संजू सॅमसनने मोडला रोहित शर्माचा सर्वात मोठा रेकॉर्ड!

**दिल्ली**–भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलचा सामना सुरू आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.



प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघातील फलंदाजांनी तुफान फटकेबाजी करून मोठी धावसंख्या उभारली. सलामीला आलेल्या संजू सॅमसनने पुन्हा एकदा चौकार–षटकारांचा पाऊस पाडून दमदार सुरूवात करून दिली. संजू सॅमसनकडे शतक झळकावण्याची सुवर्णसंधी होती. पण त्याचं शतक थोडक्यात हुकलं. यादरम्यान त्याने भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.वानखेडे स्टेडियमची खेळपट्टी ही फलंदाजीसाठी अनुकूल ठरते.

### मला आता घरी जायचेय, वेस्ट इंडिजचा वर्ल्डकपविजेता कर्णधार संतापला

**दिल्ली**–आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत शे होपच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने दमदार कामगिरी केली होती. वेस्ट इंडिजने साखळी फेरीपासून एकही सामना गमावला नव्हता. त्यामुळे वेस्ट इंडिजला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण भारतीय संघाविरूद्ध झालेल्या सामन्यातील पराभवानंतर वेस्ट इंडिजला स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं. पण वेस्ट इंडिजचे खेळाडू अजूनही आपल्या मायदेशी जाऊ शकलेले नाहीत. त्यामुळे वेस्ट इंडिजचा मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमीने सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट शेअर करत नाराजी व्यक्त केली आहे.डॅरेन सॅमीने आपल्या एक्स अकाऊंटवरून एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने, मफ्मला घरी जायचं आहेष्ठफ्फ असं लिहिलं आहे. इराण आणि इस्त्रायल या दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरू आहे. याचा परिणाम हवाई वाहतुकीवर झाल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळे स्पर्धेतून बाहेर पडलेला वेस्ट इंडिजचा संघ पुर्वनियोजित वेळापत्रकानुसार,मायदेशी परतु शकलेला नाही. आता त्यांची घरी परतण्याची प्रतीक्षा आणखी वाढली आहे.बोर्डाने खेळाडूंच्या सुरक्षेबाबत मोठी अपडेट दिली आहे. सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्य सुरक्षित असल्याचं बोर्डाने स्पष्ट केलं आहे.

### टीम इंडिया २७० पार गेली असती, पण हार्दिक पांड्याच्या चुकीमुळे घात झाला

दिल्ली–टी२० वर्ल्डकप २०२६ च्या दुसऱ्या सेमीफायनल सामन्यात टीम इंडियाने तडाखेबाज फलंदाजी केली आहे. या फलंदाजी दरम्यान मैदानात एक मोठा ड्रामा घडला होता. त्याचे झाले असे की मैदानात हार्दिक पांड्याच्या एका चुकीमुळे मोठा घात झाला आहे.. कारण टीम इंडियाने आणखी २०–२५ धावा काढू शकली असती. पण पांड्याच्या चुकीमुळे ते शक्य होऊ शकले नाही. त्यामुळे लाईव्ह सामन्यात नेमका काय ड्रामा झाला आहे. हे जाणून घेऊयात.खरं तर १८ व्या ओव्हरला ही घटना घडली होती. इंग्लंडचा सॅम करन यावेळी गोलंदाजी करत होता. सॅम करनने त्याचा तिसरा बॉल हा हार्दिक पांड्याला यॉर्कर टाकला होता. हा बॉल मारल्यानंतर तो दुर गेला होता. या दरम्यान हार्दिकने धावायाचा प्रयत्न केला आणि शिवम दुबेला कॉलही दिला. त्यानुसार शिवम दुबे धावत निघाला पण त्यानंतर हार्दिकने फिल्डरच्या हातात बॉल पाहून तो मध्येच थांबला. पण शिवम दुबे निम्मा क्रिज पार करून आलेला होता. आणि नंतर विकेट वाचवण्यासाठी पळताना दुबे रनआऊट झाला होता. शिवम दुबे ज्यावेळेस रनआऊट झाला तेव्हा तो २५ बॉलमध्ये ४३ धावा करून

## चक दे इंडिया! इंग्लंडला नमवत भारत सलग दुसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकपच्या फायनलमध्ये

**मुंबई:** भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवून सलग दुसऱ्यांदा टी–२० वर्ल्डकपच्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसऱ्या सेमी फायनलचा सामना भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडला. या मैदानावर दोन्ही डावात मोठी धावसंख्या होते. पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने २५३ धावांचा डोंगर उभारला होता. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी आणि फायनलमध्ये प्रवेश करण्यासाठी विक्रमी २५४ धावांचा यशस्वी पाठलाग करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना जेकब बेथल आणि विल जॅक्सने पूर्ण जोर लावला. पण भारतीय संघाने हा सामना ७ धावांनी जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी २५४ धावा करायच्या होत्या. त्यामुळे इंग्लंडला चांगल्या सुरूवातीची गरज होती. पण इंग्लंडला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. फिल सॉल्ट अवघ्या ५ धावा करून माघारी परतला. जोस बटलरने काही आकर्षक

### संजू सॅमसनने ८९ धावांची भागीदारी केली. तर इशान किशनने ३९ धावांची दमदार खेळी

फटके मारले. पण तो २५ धावांवर बाद होऊन माघारी परतला. कर्णधार हॅरी ब्रुकही अवघ्या ७ धावांवर बाद झाला. टॉम बँटम १७ धावांवर माघारी परतला. शेवटी जेकब बेथल आणि विल जॅक्सने मिळून इंग्लंडचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून इंग्लंडला विजयाच्या जवळ पोहोचवलं. विल जॅक्स ३५ धावा करून माघारी परतला. पण बेथलने दमदार शतकी खेळी केली आणि इंग्लंडला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवलं. पण इंग्लंडचा थोडक्यात पराभव झाला. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाला प्रथम फलंदाजीच हवी होती. भारताकडून अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आली. अभिषेक शर्मा या डावात अवघ्या ९ धावा करून माघारी परतला. त्यानंतर संजू सॅमसन आणि इशान किशनच्या जोडीने मिळून डाव सांभाळला. दोघांनी मिळून ९६ धावांची भागीदारी केली. यादरम्यान संजू सॅमसनने ८९ धावांची भागीदारी केली. तर इशान किशनने ३९ धावांची दमदार खेळी केली. त्यानंतर शिवम दुबेने ४३ धावा केल्या. कर्णधार सूर्यकुमार यादव ११ धावांवर माघारी परतला. तर हार्दिक पांड्याने २७ धावांची खेळी केली. तर तिलक वर्माने २१ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या ७ गडी बाद २५३ धावांवर पोहोचवली. भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत भारतीय संघाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना फायनलमध्ये प्रवेश केला होता. फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेला नमवून जेतेपदाचा मान पटकावला होता. यावेळी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारताने फायनलमध्ये प्रवेश केला.

## खेळाडू की हैवान; पाकिस्तानी खेळाडूंकडून मैदानाबाहेर महिलांचा विनयभंग



मुंबई–आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषकातून पाकिस्तानचा संघ बाहेर पडला असला, तरी आता एका नव्या वादामुळे पाकिस्तानी खेळाडू पुन्हा चर्चेत आले आहेत. श्रीलंकेतील कँडी येथे मुक्कामादरम्यान पाकिस्तानच्या एका खेळाडूने हॉटेलमधील महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप समोर आला आहे. 'टेलिकॉम एशिया स्पोर्ट'च्या अहवालात याबाबत दावा करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीलंकेविरुद्धच्या शेवटच्या सुपर ८ सामन्यापूर्वी ही घटना घडली. कँडीतील 'गोल्डन क्राऊन हॉटेल'मध्ये पाकिस्तानचा संघ थांबला असताना एका खेळाडूने हाऊसकीपिंग विभागातील महिला कर्मचाऱ्याशी विनयभंग केला.

महिलेने मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर हॉटेलमधील इतर कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर या प्रकरणाची माहिती पाकिस्तान संघाचे व्यवस्थापक नवीद चीमा यांना देण्यात आली.

हॉटेल व्यवस्थापनाची कठोर कारवाईची मागणी :

या घटनेनंतर हॉटेल व्यवस्थापनाने संबंधित खेळाडूवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. मात्र, संघ व्यवस्थापकांनी खेळाडूच्या वतीने माफी मागत त्याच्यावर तातडीने दंड लावून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.

पीसीबीकडून पुढील कारवाईची शक्यता :

पाकिस्तान संघ मायदेशी परतल्यानंतर या घटनेची गंभीर दखल घेतली जात आहे. संबंधित खेळाडूला पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) शिस्तभंग समितीसमोर हजर राहावे लागू शकते. टीम मॅनेजरने दंड ठोठावला असला तरी बोर्डाकडून अतिरिक्त कारवाई किंवा बंदीची शक्यता वर्तवली जात आहे. पूर्वीही वादात पाकिस्तानी खेळाडू :पाकिस्तानी खेळाडू किंवा सपोर्ट स्टाफ गैरवर्तनाच्या आरोपांमुळे यापूर्वीही वादात सापडले आहेत. गेल्या वर्षी इंग्लंड दौऱ्यादरम्यान मँचेस्टर पोलिसांनी फलंदाज हैदर अली याला बलात्काराच्या आरोपावरून अटक केली होती, मात्र पुराव्याअभावी त्याची सुटका झाली होती.

तसेच काही वर्षांपूर्वी मलेशिया दौऱ्यावेळी पाकिस्तान संघाच्या मसाज देणाऱ्या मलंग अली यांच्यावरही महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप झाला होता आणि त्यांना दंडही ठोठावण्यात आला होता.

या नव्या घटनेमुळे पाकिस्तानी संघाच्या शिस्तीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## भारत–इंग्लंड सेमीफायनलचे तिकीट न मिळाल्याने आमदार संतापले

दिल्ली–२०२६ च्या टी–२० विश्वचषकातील भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा उपांत्य सामना आज मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर रंगणार आहे. हा सामना सुरू होण्यापूर्वीच तिकीटांच्या प्रश्नावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या मुद्द्यावर विधानपरिषदेतही आमदारांनी संताप व्यक्त करत मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या कारभारावर टीका केली.

सामन्यासाठी तिकीटांची मोठी मागणी असल्यामुळे अनेकांना पास किंवा तिकीट मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली. आमदार सचिन अहिर यांनी परिषदेत हा मुद्दा उपस्थित करत, मफ्भारत–इंग्लंड सामना मुंबईत होत आहे, याचा अभिमान आहे. मात्र पूर्वी शरद पवार बीसीसीआयचे अध्यक्ष असताना अधिवेशनाच्या काळात सदस्यांना पास दिले जात. आता मोठ्या कंपन्यांचे लोक स्टेडियममध्ये बसतात, पण आमदारांना पास मिळत नाहीत,फ्फ अशी खंत व्यक्त केली.

तसेच सनदी अधिकारी आणि पोलिसांना तिकीट मिळतात, पण आमदारांना पास मिळत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. काहींना ममस्काफ लावल्यावरच पास मिळतात, असा आरोपही त्यांनी केला.

काय म्हणाले आमदार?

उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, मफ्महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सामना असताना आम्ही सदस्यांना तिकीट देतो. तसंच येथेही आमदारांसाठी पासची व्यवस्था व्हायला हवी. अधिवेशन सुरू असताना सदस्यांना सामना पाहण्यासाठी योग्य व्यवस्था असावी.फ्फ

सभापती राम शिंदे यांनीही या परिस्थितीबद्दल नाराजी व्यक्त करत, मफ्सचिन अहिर यांनी अतिशय केविलवाणी परिस्थिती मांडली आहे. क्रीडामंत्री बघ्याची भूमिका घेत आहेत. आमदारांसाठी पासेसची व्यवस्था करायला हवी,फ्फ असे मत व्यक्त केले.

दरम्यान, आमदार अनिल परब यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मफ्आम्हाला फुकट पास नकोत. आमच्याकडून पैसे घ्या, पण तिकीट तरी द्या. आम्हाला फुकट काहीही नको.फ्फ

यावर आमदार दत्तात्रय भरणे यांनीही लक्ष वेधत सांगितले की, क्रीडा विभागालाही पास दिले जात नाहीत. भविष्यात अधिवेशनाच्या काळात सामने असतील तर सदस्यांसाठी पास उपलब्ध करून देण्याची तरतूद केली जावी. दरम्यान, आज होणाऱ्या भारत–इंग्लंड उपांत्य सामन्यापूर्वीच तिकीटांच्या मुद्द्यावरून निर्माण झालेला हा वाद चर्चेचा विषय ठरत आहे. क्रिकेटचा उत्साह एका बाजूला असताना, दुसऱ्या बाजूला तिकीट वितरणाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



## युद्धाची धास्ती आता क्रिकेटच्या खेळपट्टीवर...

**दिल्ली**–मिडल ईस्टमधील वाढत्या लष्करी तणावाचा परिणाम आता क्रिकेटवरही दिसू लागला आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे आणि त्या परिसरातील बिघडलेल्या सुरक्षा परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदला (घ्ण्ण) मोठा निर्णय घ्यावा लागला आहे. आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक लीग–२ मधील सहा सामने सध्या स्थगित करण्यात आले आहेत.

हे सर्व सामने १० मार्चपासून नेपाळमध्ये खेळवले जाणार होते. मात्र, प्रवास आणि सुरक्षेसंदर्भातील चिंतेमुळे हे सामने पुढील सूचना मिळेपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहेत. आता या सामन्यांसाठी नवीन तारखांची घोषणा नंतर केली जाणार आहे.

नेपाळमध्ये होणार होते सामने

नियोजित वेळापत्रकानुसार हे सामने काठमांडू येथील त्रिभुवन विद्यापीठ आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर खेळवले जाणार होते. १० ते २० मार्चदरम्यान येथे एकूण सहा वनडे सामने आयोजित करण्यात आले होते. या त्रिकोणी मालिकेत नेपाळ, ओमान आणि यूएई या संघांमध्ये सामने होणार होते.



मात्र, मिडल ईस्टमधील वाढत्या संघर्षामुळे हवाई प्रवासावर परिणाम झाला आहे. अनेक विमानमार्ग बंद झाले असून सुरक्षा चिंताही वाढल्या आहेत. त्यामुळे संघांना नेपाळमध्ये पोहोचणे कठीण झाले. या पार्श्वभूमीवर हे सामने पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. नेपाळ क्रिकेट संघटनेची माहिती

या निर्णयाची माहिती नेपाळ क्रिकेट असोसिएशनने ४ मार्च रोजी सोशल मीडियावरून दिली. मिडल ईस्टमधील सध्याची परिस्थिती लक्षात घेता काठमांडूमध्ये होणारे लीग–२ सामने पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे बोर्डाने स्पष्ट केले. ओमान, यूएई आणि नेपाळ यांच्यातील सर्व सामने यामुळे प्रभावित झाले आहेत. आयसीसी आणि संबंधित क्रिकेट बोर्ड परस्पर चर्चेनंतर लवकरच नवीन वेळापत्रक जाहीर करतील, असेही सांगण्यात आले.

२०२७ वर्ल्ड कप पात्रता प्रक्रियेचा भाग

आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२७ साठीच्या पात्रता प्रक्रियेत क्रिकेट वर्ल्ड कप लीग–२ या स्पर्धेची महत्त्वाची भूमिका आहे. ही स्पर्धा तीन वर्षे चालते आणि त्यात एकूण आठ संघ सहभागी होतात. स्पर्धेच्या अखेरीस गुणतालिकेतील अव्वल चार संघ क्वालिफायर फेरीत पोहोचतात. तेथूनच वर्ल्ड कपमध्ये खेळण्याचे अंतिम स्थान निश्चित होते. उर्वरित संघांना पुढील संधी मिळवण्यासाठी अतिरिक्त सामने खेळावे लागतात. त्यामुळे या स्पर्धेतील प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

पुढील फेरी नामिबियामध्ये नेपाळमध्ये होणारे सामने सध्या स्थगित असले तरी लीग–२ चे पुढील सामने एप्रिलमध्ये खेळवले जाणार आहेत. पुढील फेरी स्कॉटलंड, ओमान आणि नामिबिया यांच्यात नामिबियाची राजधानी विंडहोक येथे २ एप्रिलपासून सुरू होणार आहे. सध्या गुणतालिकेत अमेरिकेचा संघ अव्वल स्थानावर असून पात्रता शर्यतीत मजबूत स्थितीत आहे. आता मिडल ईस्टमधील परिस्थिती कधी सुधारते आणि स्थगित केलेल्या सामन्यांसाठी नवीन तारखा कधी जाहीर होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# “लातूर पोलिसांची माणुसकी” पोलीस भरतीसाठी आलेल्या युवकांसाठी राहण्याची तसेच चहा-नाश्ता व अल्पोपहाराची व्यवस्था

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात सध्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण टप्पा सुरू असून जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून हजारो तरुण मोठ्या उत्साहाने या प्रक्रियेत सहभागी होत आहेत. अंगावर खाकी वर्दी परिधान करून समाजसेवा करण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवून हे युवक विविध मैदानी व कौशल्य चाचण्यांमध्ये उत्साहाने सहभागी होत आहेत. सदर भरती प्रक्रियेसाठी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने उमेदवार लातूर येथे येत असल्याने त्यांच्या सोयीसुविधांचा विचार करून लातूर पोलिसांकडून भरती प्रक्रिया सुरू झाल्यापासूनच उमेदवारांसाठी राहण्याची तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी व आवश्यक सुविधा पोलीस प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



११ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान पोलीस शिपाई भरती घेण्यात आली. सदर प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे, गोळाफेक तसेच इतर शारीरिक व कौशल्य चाचण्या द्याव्या लागतात. सध्या वातावरणातील वाढती उष्णता लक्षात घेता उमेदवारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये तसेच भरती प्रक्रिया सुरक्षित व सुरळीत पार पडावी यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पोलिस भरती प्रभारी अधिकारी श्री मंगेश चव्हाण, अपर पोलिस अधीक्षक यांना सूचना दिल्या. त्यावरून अपर पोलिस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांनी सूचनेनुसार विशेष नियोजन केले होते. त्यानुसार पहाटे ०५.०० वाजल्यापासूनच मैदानी चाचण्यांना सुरुवात करून सकाळी ०९.०० वाजेपर्यंत सर्व चाचण्या पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे उमेदवारांना कडक उन्हाचा त्रास सहन करावा लागला नाही. तसेच पोलीस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना आरोग्यविषयक काही समस्या उद्भवू नये यासाठी वैद्यकीय पथक, कार्डियाक ॲम्बुलन्स, सज्ज ठेवण्यात आली होती. त्यामुळे पोलीस भरती निर्विघ्नपणे कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पडला त्या संदर्भात अनेक युवकांनी लातूर पोलीस दलाचे आभार व्यक्त केले होते.

तसेच दिनांक ०४ मार्च २०२६ पासून ७ मार्च दरम्यान चालक पोलीस शिपाई पदाची कौशल्य चाचणी सुरू झाली असून या चाचणीत उमेदवारांना विविध प्रकारची वाहने चालवून दाखवावी लागतात. ही चाचणी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेतली जात असून सदर कौशल्य चाचणीला काहीसा वेळ लागतो. अनेक उमेदवार सकाळी लवकर उपाशीपोटीच चाचणीसाठी उपस्थित राहत असल्याचे निदर्शनास आले.

या बाबीची संवेदनशीलतेने दखल घेत पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून आणि अपर पोलिस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली लातूर पोलिसांकडून उमेदवारांसाठी सकाळी चहा-नाश्ता तसेच दुपारी स्नॅक्स/अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. केलेल्या सुविधेबाबत उमेदवारांनी समाधान व्यक्त केले असून जिल्हा पोलिस दलाचे कौतुक केले आहे.

कोणताही उमेदवार उपाशीपोटी राहू नये व सर्व उमेदवारांना वाहन चालवण्याची कौशल्य चाचणी योग्य प्रकारे देता यावी, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांसाठी स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील पोलीस प्रशासनाकडून करण्यात आली असून पोलीस अधिकारी व अंमलदार या सर्व व्यवस्थेवर विशेष लक्ष ठेवून आहेत.

पोलीस भरती ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून हजारो तरुणांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या युवकांप्रती संवेदनशीलता, माणुसकी व जबाबदारीची भावना जपत लातूर पोलिसांनी केलेली ही व्यवस्था सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.

एकंदरीत, कायद्याची अंमलबजावणी करतानाच समाजाशी संवेदनशील नातं जपणारा आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीचा आदर्श ठेवणारा लातूर पोलीस दलाचा हा उपक्रम आहे.

## रामलिंग जवळगा येथे ८ ते ११ मार्चपर्यंत नाथषष्ठी उत्सव सोहळ्याचे आयोजन

### ह.भ.प.गुरुवर्य चंद्रशेखर महाराज देगलूरकर, हभप महेश महाराज, पंडित पद्मनाभ व्यास हभप माधव कुळकर्णी यांची होणार कीर्तन सेवा; कुलकर्णी वाड्यात दहा दशकापासून नाथषष्ठी होते साजरी

**लातूर/प्रतिनिधी :**देवनी तालुक्यातील रामलिंग जवळगा येथील कुलकर्णी परिवाराच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नाथषष्ठी उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून ८ मार्च ते १२ मार्च पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ८ मार्च रोजी सकाळी ४ ते ६ काकडा आरती सकाळीं ६ ते७ समाधी पूजा,हरिपाठ सायंकाळी ९ ते११ वाजेपर्यंत ह भप महेश महाराज वाढवणकर यांचे कीर्तन होईल तर ९ मार्च रोजी सकाळीं ११ ते१ वाजेपर्यंत गाथामुर्ती हभप गुरुवर्य चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचे गुलालाचे कीर्तन होईल त्यानंतर महाप्रसाद होईल सायंकाळी ७ ते ९ पर्यंत हभप संजय कुलकर्णी खडकउमर्गेकर यांचे किर्तन होईल १० मार्च रोजी सायंकाळी ९ते ११ वेळेत पंडित पद्मनाभ व्यास यांचे किर्तन होईल नाथ षष्ठीचा समारोप व काल्याचे किर्तनदुपारी १ते ३ या वेळेत ह भ प माधव महाराज कुलकर्णी जवळगेकर यांचे होईल त्यानंतर महाप्रसाद होईल.



या नाथ षष्ठीचा उत्सव सोहळ्याचा भाविक ग्रामस्थ परिसरातील भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नरसिंग कुलकर्णी हभप माधव कुलकर्णी दत्तात्रय कुलकर्णी हरीराम कुलकर्णी प्रसाद कुलकर्णी श्रीकांत कुलकर्णी मुरलीधर कुलकर्णी, मुकुंद कुलकर्णी कृष्णा कुलकर्णी हभप शाम महाराज रेड्डी, ह.भ.प राम रेड्डी, हभप देवानंद रेड्डी, तंटामुक्तीचे अध्यक्ष शेषराव पाटील, विजय पाटील, नरसिंग बोकडे रामलिंग मुळे, ब्रम्हानंद रेड्डी, अनिल पाटील किशोर बिराजदार, मुरलीधर बोकडे अशोक पाटील, हनुमंत बिराजदार, शिवाजी बिराजदार, शिवाजी धनुरे बाळू इगे ,श्याम भंगे आदि सर्व ग्रामस्थ यांनी केले आहे.

## महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय: विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे ७४ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर शहरात महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्रमांक १७ मधील तुळजाभवानी नगर येथे राबविण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा समारोप सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत ७४ महिलांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांनी केवळ गृहिणी न राहता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, हा विलासराव देशमुख फाउंडेशनचा मुख्य उद्देश आहे. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन ॲग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून महिलांना घरबसल्या सन्मानाने रोजगार मिळवता यावा, या विचारातून या मोफत केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे .

या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना केवळ प्राथमिक शिलाई न शिकवता, व्यावसायिक दृष्टिकोनातून तयार करण्यात आले. तीन महिन्यांच्या या सखोल अभ्यासक्रमात कपड्यांच्या अचूक मापांनुसार कटिंग करण्याचे तंत्र, बाजारपेठेतील मागणीनुसार नवनवीन फॅशन डिझाइन्स तयार करणे, शिलाई कामातून स्वतःचा लघुउद्योग कसा सुरू करावा, याचे मार्गदर्शन देण्यात आले.

प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे प्रशिक्षणार्थी महिलांनी शिलाई कलेतील बारकावे आत्मसात केले असून, आता त्या स्वतःचे कापड दुकान किंवा बुटीक सुरू करण्यास सज्ज झाल्या आहेत. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. प्रमुख पाहुण्या म्हणून लातूर शहर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका तबस्सुम शेख उपस्थित होत्या. त्यांनी महिलांशी संवाद साधताना सांगितले की, ‘‘आजच्या युगात महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज आहे आणि फाउंडेशनचा हा उपक्रम त्या दिशेने टाकलेले एक आश्वासक पाऊल आहे.‘‘यावेळी विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, चंद्रज्योती बिराजदार, विक्रम बिराजदार, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह भागातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास दिसून येत होता. ‘‘घरची परिस्थिती बेताची असताना बाहेर जाऊन काम करणे कठीण होते, मात्र या प्रशिक्षणाने आम्हाला घरबसल्या पैसे कमवण्याची संधी मिळवून दिली आहे,‘‘ अशी भावना अनेक प्रशिक्षणार्थी महिलांनी व्यक्त केली.विलासराव देशमुख फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे प्रभाग १७ मधील ७४ कुटुंबांना आता आर्थिक हातभार लागणार असून, महिला सक्षमीकरणाचा हा लातूर पॅटर्न जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## दयानंद विज्ञानच्या डॉ.अमोल ठोसर यांना भारत सरकारचे पेटंट

### प्राण्यांपासून मानवांमध्ये पसरणाऱ्या रोगकारकांचा वेळीच शोध घेण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरणार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातील डॉ.अमोल ठोसर यांना झूनोटिक पॅथोजेन डिटेक्शन डिव्हाइस या संशोधनाला भारत सरकारचे नुकतेच पेटंट प्राप्त झालेले आहे.या संशोधनासाठी त्यांना डॉ. उल्का आडे , डॉ. सिद्धार्थ पगारे , डॉ. निर्मला पाटील यांचेही सहकार्य लाभले आहे.त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व सिनेट सदस्य व क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे यांच्यासमवेत इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपल प्रा.अनिलकुमार माळी, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती.



सदरील पेटंट संशोधनाचे महत्त्व सांगताना डॉ.अमोल ठोसर असे म्हणाले की, प्राणीजन्य आजारांचे (झूनोटिक रोगांचे) लवकर निदान करण्यासाठी विकसित करण्यात आलेले हे संशोधन अत्यंत उपयुक्त आहे.कारण सदर उपकरण प्राण्यांपासून मानवांमध्ये पसरणाऱ्या रोगकारकांचा वेळीच शोध घेण्यास उपयुक्त ठरणार आहे.तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार असून, ‘‘ वन हेल्थ ’’ संकल्पनेच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.याशिवाय या संशोधनामुळे भविष्यात आरोग्य व जैवसुरक्षा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान होईल,अशी अपेक्षा आहे.हे पेटंट मिळाल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी अशा सर्व स्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## लढत राहिले, काम करत राहिले; राज ठाकरेंच्या भेटीनंतर डोंबिवलीच्या शोरमा गर्लची पोस्ट चर्चेत

**मुंबई/प्रतिनिधी :** सोशल मीडियावर प्रसिद्ध असलेली डोंबिवलीची शोरमा गर्ल एकता सावंत हिने नुकतीच मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली. शोरमा गर्ल नावाने इन्स्टाग्रामवर लोकप्रिय असणाऱ्या एकता सावंत हिचे लाखो फॉलोअर्स आहेत. ती डोंबिवलीत रस्त्यावर शोरमाचा स्टॉल लावायची. मात्र, या स्टॉलवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने अनेकदा कारवाई केली होती. यानंतर मनसेचे नेते अविनाश जाधव हे शोरमा गर्लच्या मदतीला धावून आले होते. त्यांनी राज ठाकरे यांचा फोटो असलेला स्टॉल एकता सावंत हिला दिला होता. त्यानंतर इन्स्टाग्रामवर एकता सावंत हिची लोकप्रियता आणखीनच वाढली होती.

एकता सावंतला मनसेने केली होती मदत

एकता सावंतवर कारवाई झाली होती. त्यानंतर मनसेने केलेल्या मदतीमुळे एकता सावंत हिचा शोरमाचा व्यवसाय पुन्हा सुरु झाला होत्या. त्याबद्दल राज ठाकरे यांचे आभार मानायला एकता सावंत राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी गेली होती. राज ठाकरे यांना भेटल्यानंतर एकता सावंत हिने त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पाया पडली. शोरमा गर्लने राज ठाकरे यांना भेट म्हणून एक घड्याळ आणले होते. घड्याळाची पिशवी तिने राज ठाकरे यांच्या हातात ठेवली तेव्हा त्यांनी यामध्ये काय आहे, असे एकता सावंतला विचारले. त्यावर तिने घड्याळ असे उत्तर दिले. तेव्हा राज ठाकरे यांनी 'मला घड्याळ नको, तू मला मस्तपैकी शोरमा घेऊन ये', असे सांगत हे घड्याळ एकता सावंतला परत दिले.

## बसस्थानकातील गर्दीचा फायदा घेऊन महिलांच्या गळ्यातील दागिने चोरी करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; एक महिला आरोपी अटकेत, गुन्ह्यांची मालिका उघड

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील विविध बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी प्रभावी कारवाई करत एका महिलेस अटक केली असून तिच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे औसा, शिरूर ताजबंद व अहमदपूर येथील बसस्थानक परिसरात घडलेल्या चोरीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत.

लातूर जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथक सातत्याने गस्त व माहिती संकलन करत असताना दिनांक ०४ मार्च २०२६ रोजी रेणापूर नाका, लातूर येथील नवीन बसस्थानक परिसरात दोन संशयित महिला बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीत संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती बातमीदारामार्फत प्राप्त झाली. सदर माहितीची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचांना सोबत घेऊन सापळा रचण्यात आला. त्यावेळी संशयास्पद हालचाल करणाऱ्या एका महिलेला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिने आपले नाव पुनम (वय ३४ वर्षे, रा. गांधीनगर, उदगीर, जि. लातूर) असे सांगितले. महिला पोलीस अंमलदारामार्फत तिची अंगझडती घेतली असता तिच्याकडून एक सोन्याचे मणी मंगळसूत्र व एक सोन्याची साखळी असा अंदाजे १३ ग्रॅम ३९० मिली वजनाचा व सुमारे ७८,९५१/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर दागिन्यांबाबत अधिक चौकशी केली असता पुनम` हिने तिची साथीदार अनिता (रा. गांधीनगर, उदगीर, फरार) असल्याचे सांगण्यात येते.



हिच्यासह मागील चार ते पाच महिन्यांपासून औसा, शिरूर ताजबंद व अहमदपूर बसस्थानक परिसरात बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली.

तपासादरम्यान सदर व्यक्तींनी केलेल्या चोरीच्या घटनांपैकी पोलीस स्टेशन औसा गु.र.नं. ६४/२०२६ तसेच पोलीस स्टेशन अहमदपूर येथे दाखल असलेल्या विविध चोरीच्या गुन्ह्यांशी संबंधित बाबी उघडकीस आल्या आहेत. त्यांच्याकडील मिळालेल्या सोन्याच्या दागिने जप्त करण्यात आले असून आरोपीस अटक करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन औसा येथे ताब्यात देण्यात आले आहे.सदर प्रकरणातील दुसरी अनिता ` ही फरार असल्याचे सांगून तिचा शोध घेण्यात येत आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या पथकाने पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बाचकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, विजय पाटील , तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, हरी पतंगे, चंद्रकांत केंद्रे, महिला पोलीस अंमलदार सुरेखा मदने, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेऊन होणाऱ्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी लातूर पोलीस दल सातत्याने दक्ष असून नागरिकांनी प्रवास करताना आपल्या मौल्यवान वस्तूंबाबत विशेष काळजी घ्यावी, तसेच संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलीस प्रशासनास माहिती द्यावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## दयानंद विज्ञानच्या संगणकशास्त्र विभागातील अनुष्का तांबारेची बेंगलोर येथील कंपनीत निवड


**लातूर/प्रतिनिधी :**दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील संगणकशास्त्र विभागातील बीसीएस तृतीय वर्ष (शैक्षणिक वर्ष २०२४२५) ची विद्यार्थीनी अनुष्का तांबारे हिची टीसीएस (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये ग्रॅज्युएट ट्रेनी या पदावर निवड झालेली आहे. तिची नियुक्ती बेंगळुरू येथे करण्यात आली आहे.





त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू, प्रा.सुजाता काळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माधवराव सूर्यवंशी, बन्सी कांबळे, प्रा.सुमित जोशी, प्रा.वैभव कुलकर्णी, प्रा.अरूणा चौधरी, प्रियंका हिप्परकर यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच संगणकशास्त्र विभागासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १. जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २. जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ग्रहण सुटताच तुळजाभवानी मातेच्या अभिषेक पूजेला प्रारंभ



तुळजापूर(प्रतिनिधी)-खग्रास चंद्रग्रहण च्या पार्श्वभूमीवर मंगळवार (दि. ०३) सायंकाळी ०६:४४ ते ०६:४८ या ग्रहण कालावधीत तुळजाभवानी मातेला सोवळ्यात ठेवण्यात आले होते. यावेळी तुळजाभवानी मातेला विधीवत स्नान घालून सोवळ्यात (श्वेत वस्त्र परिधान करून) ठेवण्यात आले. दरम्यान ग्रहण संपताच ०६:५५ वा. तुळजाभवानी मातेच्या सायंकाळ अभिषेक पूजेला प्रारंभ करण्यात आला.

फाल्गुन पोर्णिमेला म्हणजेच मंगळवार (दि. ०३) रात्री चंद्रग्रहण असल्याने सायंकाळच्या तुळजाभवानी मातेचा नित्योपचार धार्मिक पूजा विधीत बदल करण्यात आला होता. सायंकाळी ६:१५ वा. पूजेची घाट झाली, यानंतर निर्माल्य विसर्जन करण्यात येवून ०६:४४ ते ०६:४८ या ग्रहण कालावधीत तुळजाभवानी मातेला शुभ्र श्वेत वस्त्रामध्ये सोवळ्यात ठेवण्यात आले. ग्रहण सुटल्यानंतर सायंकाळी ०६:५५ वा. नित्यपूजेची घाट होऊन सायंकाळचे सिंहासन पुजा, अभिषेक पुजेला प्रारंभ करण्यात आला. अभिषेक पूजा संपल्यानंतर देवीस महावस्त्र, अलंकार घालण्यात येऊन धुपारतीनंतर अंगारा काढण्यात आला तर रात्री प्रक्षाळ पुजेनंतर मंदिर बंद करण्यात आले.

रात्री संभळाचा कडकडाटात छबिना पौर्णिमा आणि मंगळवार निमित्त रात्री १० च्या सुमारास संभळाचा कडकडाटात छबिना मिरवणूक काढण्यात आली. यावेळी तुळजाभवानी मातेची चांदीची मूर्ती छबिना वाहनात ठेवून प्रदक्षिणा मार्गावर एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यात आली. यावेळी पुजारी, मंदिर संस्थानचे अधिकारी, कर्मचाऱ्यांसह भाविकांची उपस्थिती होती.

# मार्डी जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद व अपूर्व विज्ञान मेळावा



लोहारा(प्रतिनिधी)-तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा व अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला होता. जागतिक विज्ञान दिनानिमित्त अपूर्व विज्ञान मेळाव्याचे व बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सादिक शेख व बालाजी देवकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच आप्पासाहेब पाटील व अण्णासाहेब पाटील यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नूर पठाण, शिक्षण तज्ञ योगेश देवकर, उपाध्यक्ष तेजकुमार देवकर, समितीतील सर्व पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षण प्रेमी नागरिक, माजी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद मेळाव्यात वेगवेगळे खाद्यपदार्थ, भाजीपाला, फळभाज्या, विविध प्रकारचे फळे अशी विविध प्रकारचे स्टॉल मांडले होते. त्यातून विद्यार्थ्यांनी जवळपास १५ हजाराची कमाई केली. या कमाईमुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला होता. तसेच पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी अपूर्व विज्ञान मेळाव्यात १४ ते १५ प्रयोगाचे उत्कृष्ट पद्धतीने सादरीकरण केले. या मेळाव्याला गावातील नागरिक, पालकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश वाघमोडे, सहशिक्षक कैलास माणिकशेट्टी, युवराज बनकर, रमाकांत खटके, वर्षा चौधरी, महानंदा चव्हाण, विनोद कांबळे, छायाबाई सूळ, रेणुका वाघमोडे यांनी परिश्रम घेतले.

# विज्ञान दिनानिमित्त 'विज्ञानाचे चमत्कार - अंधश्रद्धा हद्दपार' कार्यक्रम उत्साहात



तामलवाडी(प्रतिनिधी)-धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, सांजा येथे शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्कार सादरीकरण सह अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर प्रभावी व्याख्यान व प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. भारतातील महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रमन यांच्या स्मरणार्थ साजरा होणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्याचे उद्दिष्ट साधले. कार्यक्रमाची सुरुवात बोला आज मिळून सारे या विज्ञान गीताने झाली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते चंद्रकांत उळेकर यांनी मंत्राने आरती पेटवणे, तीर्थ देणारा तांब्या, मोडलेली काडी मंत्राने जोडणे, प्रश्नचिन्ह बोटाच्या टोकावर स्थिर करणे, तांब्यात भूत बंद करणे, मंत्राने दिवा पेटवणे अशा विविध 'चमत्कार'चे प्रयोग विद्यार्थ्यांसमोर सादर केले. प्रत्येक प्रयोगामागील वैज्ञानिक तत्त्व समजावून सांगितल्यामुळे अंधश्रद्धेचा पर्दाफाश करण्यात आला, तसेच काही प्रयोग विद्यार्थ्यांकडून करून घेतल्याने त्यांचा सहभाग अधिक उत्स्फूर्त झाला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्यामसुंदर तनमोर सर यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक रणजीत कदम सर, श्यामसुंदर तनमोर सर, सूर्यवंशी सर तसेच महिला शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. इयत्ता पाचवी ते नववीतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी स्मरणीय ठरला.

अंधश्रद्धा निर्मूलनाचा ठोस संदेश कार्यक्रमाच्या शेवटी 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' या मासिकासाठी वार्षिक वर्गणीदार नोंदणी करण्यात आली. उपस्थित शिक्षकांपैकी पाच जणांनी तत्काळ नोंदणी करून वैज्ञानिक विचारांच्या प्रसाराला पाठिंबा दिला, हे या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले. शाळेतील आदर्श शिक्षक व भाषा विषयाचे पदवीधर तनमोर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण केली आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा ठोस संदेश दिला.

# एसटीत मद्यपानास 'शून्य सहनशीलता': परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

## चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

मुंबई (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. २५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली.यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या.तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले.या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून,असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत.सदर चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे.तसेच वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे.चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही,यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक,सहाय्यक वाहतूक अधीक्षक,वाहतूक निरीक्षक,सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे.ही तपासणी नियमितपणे होत आहे की नाही, याची खात्री स्थानक प्रमुखांनी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय बसस्थानक व आगार परिसरातील चालक,वाहक आणि विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.संबंधित विभागातील पालक अधिकाऱ्यांनी आगार व बसस्थानक भेटीदरम्यान या उपाययोजनांची अंमलबजावणी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान,या बाबतीत दक्षता विभागाकडून वेळोवेळी गोपनीय तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.मार्गतपासणी पथक,वाहतूक निरीक्षक,प्रशिक्षण विभाग आणि सुरक्षा विभाग यांच्या माध्यमातून तपासणी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मद्यपानाचे दुष्परिणाम याबाबत प्रबोधन केले जाणार आहे.तसेच आगारांमध्ये विशेष 'मद्यपान जनजागृती सप्ताह' आयोजित करून चालक-वाहक व इतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

यासोबतच जिल्ह्यातील मुख्य बसस्थानक,चालक-वाहक विश्रांतीगृहे तसेच ज्या आगारांमध्ये चालक-वाहक जास्त प्रमाणात थांबतात अशा ठिकाणी मद्यपानास प्रतिबंध करण्यासाठी विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.अतिथ्यगृह परिसरातील स्वच्छता,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,लाईट-पंखे आदी सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारीही संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी प्रशासनाने मद्यपानासंदर्भात कठोर भूमिका घेतली असून या उपाययोजनांमुळे बससेवा अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल,असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# मंदिर परिसरात मातीचे ढिगारे

तुळजापूर (प्रतिनिधी)- महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मागील दीड महिन्यापासून प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत.

मंदिर विकासाच्या नावाखाली सुरू करण्यात आलेले पाडकाम सध्या ठप्प पडल्याने मंदिर परिसरात मातीचे ढिगारे तसेच बांधकाम साहित्य विखुरलेल्या अवस्थेत असल्याचे चित्र आहे. याकडे प्रशासनाचेही लक्ष नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

मंदिर संस्थानचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून धाराशिवचे जिल्हाधिकारी कार्यरत असून विश्वस्त मंडळात उपजिल्हाधिकारी, आमदार व नगराध्यक्ष यांचा समावेश आहे. सुमारे ५६ कोटी रुपयांच्या निधीतून विकासकामांना सुरुवात करण्यात आली; मात्र पाडकामानंतर पुढील कामे रखडल्याने भाविक, पुजारी व स्थानिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जागेअभावी अडचणींचा सामना करावा लागत असून कुलधर्म व कुलाचार विधींसाठीही पुरेशी व्यवस्था नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून उद्धट वर्तन होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.मंदिर प्रशासन केवळ पेठ दर्शन व आर्थिक व्यवहारांकडे लक्ष देत असून भाविकांच्या मूलभूत सोयींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी व आमदारांकडून मोठ्या घोषणा करण्यात आल्या; मात्र प्रत्यक्षात कामाचा वेग मंदावल्याने भाविकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.मंदिरातील विकासकामे तातडीने पूर्ण करून भाविकांसाठी स्वच्छ, सुरक्षित व सुकर व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# लोहारा तालुक्यात मोबाईल सेवा ठप्प: ग्राहकांत संतापाची लाट

लोहारा : तालुक्यात मोबाईल कंपन्यांचा मनमानी कारभार दिवसेंदिवस उघड होत असून ग्राहकांना आर्थिक व मानसिक फटका बसत आहे. कंपन्या आकर्षक जाहिराती करून पाचव्या पिढीच्या सेवेचे दर आकारत असल्या तरी प्रत्यक्षात मात्र दुसऱ्या पिढीच्या दर्जाची इंटरनेट सेवा मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. पैसे ५ जीचे आणि सेवा २जीची अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

शासकीय कार्यालयांतच रेंज गायब होत असून तालुक्यातील तहसीलदार कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय, बँका तसेच खरेदी-विक्री कार्यालये यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अनेकदा मोबाईल रेंज उपलब्ध नसते. इंटरनेट इतके संथ चालते की ऑनलाइन कामकाज ठप्प होते. शासनाच्या बहुतांश सेवा ऑनलाइन झाल्या असताना अशा प्रकारे सेवा खंडित होणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नेटवर्क नसल्याने नागरिकांना साध्या कामासाठी अनेक वेळा तालुक्याला फेऱ्या माराव्या लागतात. त्यामुळे प्रवास खर्च, वेळेचा अपव्यय आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. कोंबडी चार आण्याची आणि मसाला बारा आण्याचा अशी अवस्था झाल्याची भावना व्यक्त होत आहे. दरमहा रिचार्जसाठी मोठा खर्च करूनही समाधानकारक सेवा मिळत नसल्याने ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोप आहे.

कॉल ड्रॉप, आवाज खंडित होणे, इंटरनेट बंद पडणे या समस्या सातत्याने उद्भवत आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यावर टॉवर जनरेटरवर सुरू ठेवणे अपेक्षित असताना अनेकदा वीज गेल्यावर रेंज पूर्णपणे नाहीशी होते. ग्रामीण भागात परिस्थिती अधिकच बिकट असून अनेक ठिकाणी कॉलही लागत नाहीत.

विशेषतः सरकारी कंपनी बीएसएनएलची सेवा अत्यंत ढासळलेली असल्याची तक्रार आहे. टॉवरजवळ उभे राहूनही फोन लागत नसल्याची नागरिकांची नाराजी आहे. गेल्या सहा महिन्यांपासून सेवा कोलमडलेली असताना अधिकारी काय करत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून सेवा सुरळीत करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. डिजिटल युगात मोबाईल सेवा ही अत्यावश्यक गरज बनली असून ती तत्काळ सुधारावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# भूम तालुक्यात बिबट्याची दहशत वाढली; वनविभागाचा सतर्कतेचा इशारा

भूम (प्रतिनिधी)- तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच असल्याचे समोर आले आहे. रामेश्वर शिवारात बिबट्यासदृश प्राण्याने शेळीला पकडल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिल्यानंतर आता वारेवडगाव येथे गाईवर हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली होती. ही घटना शेतकरी बाळासाहेब नलवडे यांच्या शेतात घडली असून हल्ल्यात गाईचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मंगळवारी (दि. ३ मार्च) सायंकाळी ७ वाजून १० सेकंदांनी वनविभाग व शेतकऱ्याच्यावतीने लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. बाळासाहेब नलवडे यांच्या गाईला लक्ष्य करताना बिबट्या कॅमेऱ्यात दिसून आला आहे.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाला तत्काळ कळविण्यात आले. वन अधिकारी कुटे, वनपाल जाधवर व जगताप देशमुख आदी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बिबट्याचा मागोवा घेण्यासाठी वनविभागाची टीम कार्यरत झाली असून परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे.

या सलग घटनांमुळे भूम तालुक्यासह आसपासच्या गावांतील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वनविभागाकडून तालुक्यातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी शेतात किंवा घराबाहेर एकटे जाऊ नये, जनावरे सुरक्षित व बंदिस्त ठिकाणी बांधावीत, लहान मुलांवर लक्ष ठेवावे तसेच संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा, असा संदेश देण्यात आला आहे. सतर्क रहा, सुरक्षित रहा, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649